मे.पवन हंस हेलीकॉप्टर्स लिमिटेड, मुंबई यांच्याकडून भाडे तत्वावर घेण्यात आलेल्या हेलीकॉप्टरच्या भाड्याची रक्कम अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक : एनएएक्स ०६१५/प्र.क्र.६२/विशा १ (ब)
दुसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० जानेवारी, २०१६.

<u>वाचा</u> :- १) शा.नि. गृह विभाग, क्र. एनएएक्स ०६०९/प्र.क्र.४०१/विशा-१ब, दि. ०९.०१.२०१३
२) शा.नि. गृह विभाग, क्र. एनएएक्स ०६०९/प्र.क्र.४०१/विशा-१ब, दि. ०२.०२.२०१३.
३) शा.नि. गृह विभाग, क्र. एनएएक्स ०३१३/प्र.क्र.१६३/विशा-१ब, दि. ११.१०.२०१३
४) शासनपत्र गृह विभाग क्र. बीजीटी १०१५/प्र.क्र.६१/१५/अर्थसं-१,दि.०१.०८.२०१५
५) शा.नि. गृह विभाग, क्र. एनएएक्स ०६०९/प्र.क्र.४०१/विशा-१ब, दि. २९.०३.२०१४.
६) शा.नि. गृह विभाग, क्र. एनएएक्स ०६१५/प्र.क्र.१९४/विशा-१ब, दि. १०.०९.२०१५.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. अपोमसं (विकृ)/पवनहंस/ बिल/४०/२०१०, दि. ३१.१०.२०१५.

<u>प्रस्तावना</u> :-

नक्षलग्रस्त भागात पोलीस दलाचे बळकटीकरण करण्यासाठी तसेच जखमी व्यक्ती तसेच जवानांची ने-आण करणे, जखमी जवानांना त्वरीत वैद्यकीय सहाय्य पुरविणे तसेच जवानांना खाद्यसामुग्री पुरविणे, संशयित भागाची पाहणी करणे इ. साठी मे. पवन हंस हेलीकॉप्टर्स लिमिटेड यांच्याकडून डॉफिन-एन हे हेलीकॉप्टर वेट लिजवर घेण्यात आले आहे. याबाबत सदर कंपनी सोबत करार करण्यात आलेला आहे. सदर हेलीकॉप्टरच्या भाड्याची थकीत रक्कम अदा करणे आवश्यक आहे. सदर भाड्याची रक्कम पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई / पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांना उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

नक्षलविरोधी अभियानाकरीता गडचिरोली येथे मे. पवन हंस हेलीकॉप्टर्स लिमिटेड यांच्याकडून भाडे तत्वावर घेण्यात आलेल्या हेलीकॉप्टरचे सन २०१४-१५ चे थकीत भाडे अदा करण्यासाठी पुरवणी मागणीद्वारे मंजूर रु. १०,००,००,०००/- (रुपये दहा कोटी फक्त) पैकी रु. ५,००,००,०००/- (रु. पाच कोटी फक्त) एवढी रक्कम अदा करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी दि. ३१.३.२०१६ पूर्वी खर्च करण्याची जबाबदारी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई / पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांची राहील.

यासाठीचा खर्च मागणी क्र. "बी-१, २०५५ पोलीस (००)१०९ जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस बल (२०५५ ०१६८) ५१ मोटार वाहने" या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ साठी उपलब्ध असलेल्या निधीतून खर्च भागविण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०१३०११५०५६४८२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay D Patil

Digitally signed by Vijay D Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb42793fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay D Patil
Date: 2016.01.30 11:51:12 +05'30'

(विजय पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद,
५) मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा,
६) सर्व विधान परिषद / विधान सभा सदस्य,
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग,
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर,
१०) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर,
११) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१२) आयुक्त, राज्य गुप्तावार्ता विभाग, मुंबई,
१३) अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१४) अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१५) विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर / पुणे,
१६) विशेष पोलीस महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली,
१७) जिल्हाधिकारी, गडचिरोली / गोंदिया,
१८) पोलीस अधिक्षक, गडचिरोली / अहेरी / गोंदिया,
१९) सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल,
२०) गृह विभागातील सर्व अधिकारी.
२१) जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली / गोंदिया / चंद्रपूर,
२२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२३) निवडनस्ती (विशा-१ब)